# प्रेसनोट दि.२४/०४/२०१९

## रात्रीच्या वेळी घराची खिडकी उघडून चोरी करणारा रेकॉर्डवरील आरोपी

## गुन्हे शाखा युनिट -४ पोलीसांच्या जाळयात.

चंदननगर पोलीस स्टेशन हददीत काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी घराची खिडकी उघडून लोखंडी पाईपचा सहाय्याने मोबाईल, लॅपटॉप, सोने व इतर वस्तू चोरी होत असल्याच्या घटना घडत होत्या. चंदननगर पोलीस स्टेशन गुरनं १२९/१९ मधील फिर्यादी हे राहते बिल्डींगमध्ये वॉचमनचे काम करीत असून, मुलीच्या शिक्षणाकरीता त्यांनी सदरचा लॅपटॉप हा हप्त्याने विकत घेतला होता व त्याचे दोनच हप्ते भरले होते. लॅपटॉप चोरीस गेल्यामुळे मुलीच्या शिक्षणात व्यत्यय आला होता. तसेच चंदननगर पोलीस स्टेशन गुरनं १५२/१९ मधील फिर्यादी हे आयटी कंपनीत डेटा बेस ॲडमीन म्हणून काम करीत आहे व त्यांनी सदर लॅपटॉपवर रात्रभर बसून कंपनीचा अतिमहत्वाचा प्रोजेक्ट पुर्ण करुन दुस-या दिवशी त्यांना कंपनीमध्ये प्रस्तुत करावयाचा होता त्याच रात्री आरोपी याने लिनोव्हा कंपनीचा लॅपटॉप, मोबाईल व सोने चोरी करुन पसार झाला होता.

त्या अनुशंगाने युनिट-०४,गुन्हे शाखा,पुणे शहर कडील पोलीस तपास करीत होते. तपास करत असताना पोलीस कर्मचारी अब्दुलकरीम सय्यद व सचिन ढवळे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, रेकॉर्डवरील आरोपी नामे चंद्रकांत बापू साळवे,वय २९ वर्षे, रा. कोरेगाव भिमा पुर्नवसन, गणपती मंदीराजवळ,पुणे हा चंदननगर परिसरात अशा प्रकारच्या चो-या करीत असून, तो दि. २१/०४/२०१९ रोजी पाण्याचे टाकीजवळ, चंदननगर,पुणे येथे चोरीचा लॅपटॉप विकण्याकरता येणार असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली. त्याप्रमाणे युनिट-०४ कडील पोलीसांनी सदर भागात सापळा रचून त्यास पकडून त्याचेकडून चंदननगर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेले खालील गुन्हे उघडकीस आणले आहेत.

१. चंदननगर पोलीस स्टेशन गुरनं १२९/१९ भादवि क ३८०
२. चंदननगर पोलीस स्टेशन गुरनं १५२/१९ भादवि क ३८०

वरील प्रकारे गुन्हे उघडकीस आणून आरोपीकडून सदर गुन्हयातील चोरीस गेलेला कि रु **१,५०,०००/-** चा खालील माल जप्त करण्यात आलेला आहे.

**अ. ०२** लिनोव्हा कंपनीचे लॅपटॉप
**ब. १५** ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र
**क. ०२** मोबाईल (व्हिवो, सोनी कंपनीचा)

आरोपीकडून आणखी एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून, त्याबाबत अधिक तपास चालू आहे. सदर आरोपी विरुध्द यापुर्वी विमाननगर, येरवडा पोलीस स्टेशन येथे चार गुन्हे दाखल आहेत

.सदरची कारवाई ही मा पोलीस उप आयुक्त श्री शिरीष सरदेशपांडे, सहा पोलीस आयुक्त श्री भानुप्रताप बर्गे, पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री विजय झंजाड, पोलीस कर्मचारी अब्दुलकरीम सय्यद, गणेश साळुंखे ,सचिन ढवळे, शंकर पाटील, राजू मचे, भालचंद्र बोरकर, हनुमंत बोराटे, रमेश साबळे, अतुल मेंगे यांनी केली आहे.

दि.२४/०३/२०१९

(अंजुम बागवान)
पोलीस निरीक्षकयुनिट ४,गुन्हे
शाखा,पुणे शहर